प्रेस नोट

| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. गोविंद किसनराव चव्हाण वय ५३ वर्ष पद तलाठी अमडापुर भाग –१, वर्ग–३ मुळ रा. शिवनगर, जुनागांव चिखली, जि. बुलडाणा |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०००/– रूपये |
| घटनास्थळ | तलाठी कार्यालय अमडापुर |
| घटना तारीख | ०४.११.२०२० |

थोडक्यात हकीकत :– यातील तक्रारदार यांची अमडापुर शिवारातील भाग १ मध्ये गट नं. ५०६ मध्ये ३४ गुंठे जमीन असुन सदर जमीनीवर तक्रारदार यांनी ग्राम सेवा सह संस्था मंगरुळ नवघरे येथुन शेतीवर कर्ज घेतले होते. सदर कर्जाचा भरणा तक्रारदार यांनी केलेला असुन कर्ज भरणा केलेबाबत सदर संस्थेने बोजा कमी करणेबाबत तलाठी अमडापुर यांना पत्रव्यवहार केलेला असतांना सुध्दा आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना त्यांचे जमीनीचे ७/१२ वरील कर्जाचा बोजा कमी करण्याकरिता पंच क्र. १ यांचे समक्ष १,०००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार अॅन्टी करप्शन ब्युरो बूलडाणा घटकाकडे नोंदविली होती.

सदर तक्रारीवरुन आज दिनांक ०४.११.२०२० रोजी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता लोकसेवक गोविंद किसनराव चव्हाण वय ५३ वर्ष पद तलाठी अमडापुर भाग –१, वर्ग–३ मुळ रा. शिवनगर, जुनागांव चिखली, जि.बुलडाणा यांनी तक्रारदार यांचे शेतीवरील ७/१२ मधील कर्जाचा बोजा उतरवण्यासाठी पंच क्रमाक १ यांचे समक्ष १,०००/– रूपये लाचेची मागणी केली व लाच स्विकारण्याची तयारी दर्शविलयाने आज दिनांक ०४.११.२०२० रोजी रितसर सापळा कार्यवाही आयोजित केली असता लोकसेवक चव्हाण तलाठी अमडापुर भाग १ यांनी पंच क्र. १ यांचेसमक्ष लाच रक्कम १,०००/– रुपये उजवे हाताने स्विकारुन टेबलावरील असलेल्या कागदाचे खाली ठेवले. आरोपी लोकसेवक श्री. गोविंद किसनराव चव्हाण वय ५३ वर्ष पद तलाठी अमडापुर भाग –१, वर्ग–३ मुळ रा. शिवनगर, जुनागांव चिखली, जि.बुलडाणा यांनी आपले लोकसेवक पदाचा गैरवापर करुन स्वत:साठी पैश्याचे स्वरुपातील अर्थिक लाभ मिळविण्यासाठी लोकसेवक पदाला न शोभनारे गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द कलम ७ लाच लुचपत प्रतीबंधक कायदा १९८८ संशोधन २०१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर कार्यवाही :– १. मा. श्री. विशाल गायकवाड पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. पंजाबराव डोंगरदिवे अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. आर.एन.मळघणे, पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा व सापळा पथकातील स्टाफ नापोका. विलास साखरे, नापोकॉ मोहमद रिजवान, नापोकॉ रविंद्र दळवी, पोकॉ विजय मेहेत्रे व चालक पोकॉ मधुकर रगड यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व ९६६५७०६६७७ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे

( आर.एन.मळघणे )
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner